# मायबोलीला सन्मान पुरस्कार

**जळगाव :-** गेली दहा वर्षे मराठी समाज आणि संस्कृतीसाठी उत्तर अमेरिका आणि महाराष्ट्रात केलेल्या विशेष कार्याबद्दल, मायबोली डॉट कॉम या संकेतस्थळाला या वर्षीचा बृहनमहाराष्ट्र मंडळाचा सन्मान पुरस्कार देण्यात आला. मायबोलीचे मुख्य वित्त अधिकारी समीर सरवटे यांनी मायबोलीच्या वतीने अधिवेशनाचे प्रमुख वक्ते डॉ. श्री. नरेंद्र जाधव यांच्याकडून तो स्वीकारला.

१६ सप्टेंबर, १९९६ रोजी सुरु झालेले मायबोली.कॉम हे सर्वात जुने मराठी संकेतस्थळ आहे. अजय आणि भावना गल्लेवाले यांनी वैयक्तिक वेबसाईट म्हणून सुरू केलेल्या या छोट्याशा संकेतस्थळावर आज सुमारे ८४ हजारापेक्षा जास्त पानांचा मजकूर



**डॉ. नरेंद्र जाधव यांच्याकडून बृहनमहाराष्ट्र मंडळाचा सन्मान पुरस्कार स्वीकारतांना मायबोलीचे मुख्य वित्त अधिकारी समीर सरवटे.**

आहे आणि सरासरी दर महिन्यात एक लाखाहुन जास्त वेळा मराठी वाचक मायबोलीला भेट देतात. या दहा वर्षात मायबोलीने महाजालावर अनेक नवीन पायंडे पाडले. पहिली मराठी शुभेच्छापत्रे, दहा वर्षे २४ तास सतत सुरू असणारी मराठी अंताक्षरी, पहिली मराठी ऑनलाईन कादंबरी, आंतरजालावरचे मराठी माणसांचे खुले व्यासपीठ हितगुज, जगभरच्या भाविकांनी एकत्र साजरा केलेला आंतरजालावरचा गणेशोत्सव, पहिला ऑनलाईन दिवाळी अंक, ऑनलाईन खरेदी/विक्री, मराठी व्यावसायिकांसाठी विनामुल्य छोट्या जाहिराती असे अनेक उपक्रम आजही चालू आहेत.

या यशामागे मायबोलीला वेळोवेळी मदत केलेल्या स्वयंसेवकाचा मोठा हातभार आहे.

संगणक आज्ञावली लेखन, स्वगत समिती, मदत समिती, नेमस्तक, दिवाळी अंक संपादक मंडळ, गणेशोत्सव समिती, वर्षाविहार समिती अशा विविध प्रकारे, १६ वर्षापासून ते ८६ वर्षापर्यंत, विविध वयाच्या स्वयंसेवकांनी मायबोलीवरचे आणि मराठी संस्कृतीवरचे आपलं प्रेम व्यक्त केले आहे.